# कविता टिपण्यासाठी शोधक नजर आवश्यक

## विष्णू सूर्या वाघ : दोडामार्ग येथील काव्य मैफल कार्यक्रमात प्रतिपादन

कसई दोडामार्ग : कविता ही आपल्या अवतीभवतीच, प्रत्येक गोष्टीत असते. पण ती टिपता आली पाहिजे. तशी नजर आपल्याकडे असायला हवी, तरच आपण कविता लिहू शकतो, असे प्रतिपादन गोव्यातील सुप्रसिध्द कवी व आमदार विष्णू सूर्या वाघ यांनी केले. लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय, दोडामार्गमधील मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे आयोजित काव्य मैफिलीच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, त्यांच्यात मराठी साहित्याविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय मंडळातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कवितेविषयी गोडी निर्माण व्हावी, यासाठी मराठी, कोकणी व मालवणी 'काव्य मैफल' या कार्यक्रमात प्रमुख अतिथी आणि कवी म्हणून बोलताना ते म्हणाले, कविता ही आपल्या जगण्यातून झाली पाहिजे. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीत कविता असते. आपल्या अवतीभवती ती वावरत असते. फक्त तिला पहायला शिकले पाहिजे. सभोवतालच्या वातावरणाशी जुळवून घेतलं, तरच कविता होऊ शकते. कविता ही माणसाला जगायला शिकवते, ती जगण्याला अर्थ देते. कवितेतील शब्द कधी हसवतात, कधी रडवतात, कधी अंतर्मुखही करतात. त्यातून जगण्याला एक नवी प्रेरणा मिळते. निसर्गाकडे कवीच्या नजरेने पाहिले पाहिजे.


शिरीष नाईक

हळबे महाविद्यालयातील काव्यमैफलीचा शुभारंभ आमदार विष्णू सूर्या वाघ यांच्या हस्ते झाला. यावेळी विजय पाटील, भाई परमेकर, उल्हास नाईक, विवेकानंद नाईक आदी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी आपल्या शैलीत विविध कविता सादर करताना उपस्थितांना खळखळून हसायला लावले, तर कधी अंतर्मुखही केले. यावेळी त्यांच्या 'वटवृक्षाची जशी सावली तशीच असते आई, आई म्हणजे अपार डोंगर मेहनत अन् कष्टांचा' ही आईवरची कविता ऐकून सारेच भावूक झाले. तर 'माझं काळीज प्रिंटींग मशीन तू माझी इंपोर्टेड शाई, छापायला गेलो तुझं नाव- जाई, पण प्रुफ रिडर झोपला आणि छापून आलं ताई' या कवितेने खळाळून हसायलाही लावले.

पाहुण्यांचा परिचय, प्रास्ताविक व कवी विष्णू सूर्या वाघ यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केला. यावेळी व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य भाई परमेकर, विवेकानंद नाईक, सूचन कोरगावकर, ॲड. प्रवीण नाईक, प्रेमप्रकाश नाईक, ज्येष्ठ कलावंत चंद्रकांत गावस, शिरीष नाईक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन मराठी भाषा व वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. दिलीप बर्वे यांनी केले. तर आभार प्रा. सोपान जाधव यांनी मानले. (वार्ताहर)